# असंख्य महिलांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश



**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**हिंगणघाट :** शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महिला काँग्रेस पदाधिकारी व सदस्यांचे नियुक्त्यांचा कार्यक्रम वर्धा जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा हेमलता मेघे यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक हरिओम सभागृह येथे पार पडला.

उपरोक्त कार्यक्रमात सौ.रागिणी शेंडे यांची वर्धा जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांचे सोबत हिंगणघाट शहरातील प्रतिभा चौधरी, छाया बाभुलकर, अर्चना भुते, सुनीता चंदनखेडे, निशा धोबे, बेबी काल्हे, नंदा चौधरी, शारदा सोनटक्के, शकुंतला बावणे, सुनीता गुजरकर, मंदाकिनी ढोले इत्यादी असंख्य महिला सदस्यांनी काँग्रेस पक्षात रीतसर प्रवेश घेतला. याप्रसंगी शहर काँग्रेस चे अध्यक्ष पंढरीनाथ कापसे, हिंगणघाट काँग्रेस, हिंगणघाट तालुका काँग्रेसचे प्रभारी प्रविण उपासे, ज्वलंत मून, नरेंद्र चाफले, सुवर्णा भोयर, पुष्पा लांबट, गायत्री गावंडे, सय्यद मेराज, गुणवंत कारवाटकर, राजू हिंगमीरे, सुनील हरबुडे, महिपल रामटेके, पुरुषोत्तम मून, सुरेंद्र बोरकर, गुणवंत कोठेकर, प्रविण धोटे, सुरेश गोहणे, चंदू पिठाडे, सुरेश गायकवाड, अंकुश ससाणे, चारभे गुरुजी, प्रमोद जुमडे, हनुमंत भाजीपाले, श्रीराम येळणे, दामोदर वानखेडे, गुणवंत वानखेडे, शंकर डुकरे, राजू मुडे, धनराज महाकाळकर, चंदू कुबडे, इत्यादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## भाजप जिल्हाध्यक्षपदी सुनील गफाट कायम, एकमुखी निवड



साहसिक वृत्त / १९ जुलै
वर्धा : प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वर्धा जिल्हा भाजपचे अध्यक्ष म्हणून सुनील गफाट यांनाच परत संधी दिली आहे.दीड वर्षापूर्वी जिल्हाध्यक्ष डॉ.गोडे यांनी राजीनामा देत पक्ष सोडल्याने तडकाफडकी गफाट यांची निवड करण्यात आली होती. त्यांना आता पर्यंत त्यामुळे दीड वर्षाचा कालावधी मिळाला.आता पुढील तीन वर्षासाठी निवड केल्या जाणार असल्याने काही या पदासाठी कामाला लागले होते.त्यामुळे गफाट राहणार की जाणार, अशी चर्चा सुरू झाली.

पण खासदार रामदास तडस तसेच पक्षाचे सर्व आमदार यांनी गफाट यांच्याच नावाला पसंती दिली.कारण अवघ्या दीड वर्षात त्यांनी पक्ष संघटनेत सगळे कार्यक्रम यशस्वी करून दाखविले तसेच विनातक्रार सर्वांना घेवून चालण्याची हातोटी दाखविली.ज्येष्ठ तसेच युवा नेत्यांचा योग्य समन्वय राखण्याचे काम त्यांनी केल्याचे म्हटल्या जाते.आपली निवड सर्वांच्या मनापासून मिळालेल्या होकरामुळे झाल्याचे ते म्हणतात.त्यांना एकूण आता साडे चार वर्षाचा कालावधी लाभणार.

## गिरड पोलीसांचे दारूची अवैध वाहतुक करणाऱ्याविरूध्द धाड

**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**वर्धा :** आज दिनांक १८/०७/२३ रोजी रात्री ००:१५ वाजता दरम्यान गिरड पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे गिरड पोलीसांनी गांगापुर फाटयावर ठाणेदार श्री. सुनिल दहिभाते यांचे मार्गदर्शनात नाकेबंदी केली असता समोरून एक काळया रंगाची बजाज पल्सर २०० आर.एस. मो.सा क एम.एच. ३२ / ऐ. जी / ६२०६ चे टॉकवर प्लॉस्टीक चुंगडी ठेउन दारूची वाहतुक करून कोरा कडे येतांना दिसली. वाहनास थांबवुन प्लॉस्टीक चुंगडीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारूने भरलेल्या २०० सिलबंद निपा किंमत गाडीसह एकुण १,०६०००/- रूचा माल मिळुन आल्याने आरोपी प्रणय प्रणय विलास मेश्राम, वय २० वर्ष, रा. महाराष्ट्र बँक जवळ तुकुम चंद्रपुर जि.



चंद्रपुर ह/मु वडगांव बौद विहारा जवळ ता. वरोरा जि. चंद्रपुर याचेवर कलम ६५ (अ) (ई), ७७ (अ) मदाका सहकलम ३ (१) १८१,१३०/१७७ मोबाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही श्री. नुरुल हसन पोलीस अधिक्षक वर्धा श्री. सागर कवडे, अप्पर पोलीस अधिक्षक वर्धा श्री. रोशन पंडीत, उप विभागीय पोलीस अधिकारी हिंगणघाट आणी श्री. सुनिल दहिभते सहाय्यक पोलीस निरीक्षक / ठाणेदार पोलीस स्टेशन गिरड यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक असिम शेख, अनुप टपाले यांनी केली आहे.

पान १ वरुन

### मणिपूर हिंसाचारावर चर्चेस सरकार तयार, प्रल्हाद जोशी म्हणाले-प्रत्येक मुद्द्यावर नियमानुसार चर्चा

अधिवेशनासाठी ३२ मुद्दे आहेत.
काँग्रेसचे मीडिया प्रभारी जयराम रमेश म्हणाले - मोदी सरकारने मणिपूर हिंसाचार आणि महागाईवर संसदेत चर्चा करावी. सरकारला जुनी वृत्ती बदलावी लागेल. आत्तापर्यंत ते 'माझे ऐका, नसता चालते व्हा' अशी भूमिका घेत आले आहेत, असेही रमेश म्हणाले.
याआधी पावसाळी अधिवेशन नव्या संसद भवनात होणार असल्याच्या बातम्या आल्या होत्या. पण केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी यांनी ३ जुलै रोजी पावसाळी अधिवेशन जुन्या संसदेतच होणार असल्याचे सांगितले.
याआधी पावसाळी अधिवेशन नव्या संसद भवनात होणार असल्याच्या बातम्या आल्या होत्या. पण केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी यांनी ३ जुलै रोजी पावसाळी अधिवेशन जुन्या संसदेतच होणार असल्याचे सांगितले.
११ ऑगस्टपर्यंत चालणार, १७ बैठका
संसदेचे पावसाळी अधिवेशन ११ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. दोन्ही सभागृहांच्या एकूण १७ बैठका प्रस्तावित आहेत. सरकारी सूत्रांच्या मते, अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके मांडली जाणार आहेत. सर्व पक्षांनी अधिवेशन चालवण्यासाठी सहकार्य करावे, कारण नियम आणि प्रक्रियेनुसार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास सरकार मागे हटत नाही, असेही म्हटले आहे.
लोकसभा सचिवालयाच्या बुलेटिननुसार, अधिवेशनात दिल्ली अध्यादेशासह २१ नवीन विधेयके मांडली जाऊ शकतात. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी यापूर्वी १८ जुलै रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती, परंतु एनडीए आणि विरोधी पक्षांच्या बैठकीमुळे ती स्थगित करावी लागली.
रमेश यांनी सांगितले कोणत्या मुद्द्यांवर होणार चर्चा
काँग्रेस खासदार जयराम रमेश म्हणाले की, आम्हाला मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चा करायची आहे. राज्यपाल आणि नायब राज्यपालांच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या राज्य सरकारांवर होणाऱ्या हल्ल्यांवरही चर्चा होणार आहे. महागाई आणि अदानी प्रकरणातील संयुक्त संसदीय समितीवरही चर्चा होणार आहे. दिल्ली अध्यादेश, वन संरक्षण कायदा दुरुस्ती विधेयक आणि जैविक विविधता कायदा दुरुस्ती विधेयकाला संसदेत विरोध करणार असल्याचे जयराम रमेश म्हणाले.

### यमुना नदी १३ वर्षांनंतर ताजमहलपर्यंत पोहोचली, पुरामुळे देशात १५ हजार कोटींचे नुकसान; १५ राज्यामध्ये पूरसदृश स्थिती

देशातील सुमारे १५ राज्यांतील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरसदृश स्थिती आहे. यामध्ये यूपी, बिहार, दिल्ली, हिमाचल प्रदेश, आसाम, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, गोवा, उत्तराखंड आणि गुजरातचा समावेश आहे.
गुजरातच्या राजकोटमध्ये मुसळधार पावसाने जिल्ह्यात अनेक वाहने बुडताना दिसली. धोराजीत मंगळवारी ३०० मिमी पावसाची नोंद झाली.

### वर्धा जिल्ह्यात परिणाम हेल्थ केअर चा भंडाफोड होताच तोतया अमनसिंग व चमनसिंग बंधूंनी आपला मोर्चा वळविला अमरावती जिल्ह्यात

लि. चे नागपूर येथील ऑफिस एका भाड्याचे घरातून चालविण्यात येत आहे. मागील ४ वर्षापासून नागपूर येथील ब्रॉंच ऑफिसला बोर्ड सुद्धा लावला नाही. महाराष्ट्र शासनाची परवानगी आवश्यक आहे. ती नाही. कंपनीचे स्वत:चे प्रोफाईल सुद्धा नाही. कंपनीला सदरची औषधी नेटवर्कींग मार्केटिंग च्या माध्यमातून विकता येत नाही. असे असताना सुद्धा दर १५ दिवसांनी महाराष्ट्रातील २०० जिल्ह्यात व १० राज्यात हा गोरखधंदा मोठ्या जोमाने सुरु आहे. चिखलदरा येथे सुद्धा सिल्वर, स्टार, गोल्ड स्टार, डायमंड स्टार, क्राऊन स्टार यांना बोलावून धांगडधिंगा डान्स करण्यात येवून परिणाम हेल्थ केअर ची बोगस औषधी विकून हे दलाल, एजंट मौजमज्जा करीत आहे.

ग्राहकांना बायो मॅग्नेट, सी बक्थोर्न कॅप्सुल, मोरींगो कॅप्सुल, नोनी ज्सूस, एलोविरा फायबर्स ज्युस, बिटग्रास ज्युस, शुगर केअर ज्युस, टुथपेस्ट, पसीएजियम हस्क कॅप्सुल व अन्य ५५ प्रकारच्या नकली औषधी विकण्याच्या गोरख धंद्याचा दै. साहसिक वृत्तपत्रांनी भंडाफोड करताच परिणाम हेल्थ केअर प्रा.लि. चे दलाल व एजंट डॉ. संजय बोबडे व त्यांची पत्नी यांनी आपला प्रभार लोकांना मोठ्या प्रमाणात टोपी घालणाऱ्या गणेश जेगडे कडे दिला आहे. दै. साहसिकची चमू आता अमरावती जिल्ह्यात जावून गणेश जेगडे च्या डान्स कार्यक्रमाची संपुर्ण माहिति वाचकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**क्रमशः**

### तब्बल दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर बिबट्याला रेस्क्यू करण्यात यश

विविध राज्यातील तसेच विदेशातील विद्यार्थी हिंदीचे शिक्षण घ्यायला आले असल्याने त्यांच्या सुरक्षेची काळजी होतीच.त्यातच आज दुपारी साडेबारा वाजता तो काहींना दिसला होता.त्यानंतर वनविभाग,पोलिस तसेच पीपल फॉर अनिमल्सची चमू घटनास्थळी दाखल झाली होती.त्याचा विद्यापीठालगतच्या जंगलात शोध सुरू केला गेला.साडेतीन तासांच्या सर्च ऑपरेशननंतर तो पकडला गेला.आपला पाठलाग होत असल्याचे पाहून बिबट विद्यापीठ परिसरातील जंगलातल्या झाडांतून सारखा पळत होता तर वनविभागाची चमू,पीपल फॉर अनिमल्सचे आशिष गोस्वामी,त्यांचे सहकारी तसेच विद्यापीठातील सुरक्षा रक्षक त्याचा पाठलाग करीत त्याला जेरबंद करण्यास प्रयत्न करीत होते.

बिबट बेशुद्ध होताच त्याला हिरव्या जाळीत टाकून रेस्क्यू व्हॅनद्वारे करुणाश्रमात आणले गेले.येथे त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असल्याचे पीपल फॉर अनिमल्सचे आशिष गोस्वामी यांनी सांगितले.नंतर त्याला कोठे ठेवायचे,याचाही निर्णय घेतला जाईल.यावेळी करुणाश्रमाचे आशिष गोस्वामी यांच्यासोबत कौस्तुभ गावंडे तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते.
तो तापाने फणफणत होता तसेच त्यांच्या अंगात १०५ अंश ताप होता,असेही त्याच्या वैद्यकीय तपासणीतून स्पष्ट झाले आहे.त्याच्या रक्ताचे नमुने तपासणीकरीता नागपूरच्या प्रयोगशाळेत पाठविले असून त्याला काविळ झाली असावी,असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. या परिसरात सातत्याने बिबट वावरतो,त्यातच तो काही प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांना दिसल्यानंतर त्यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान दुपारी तीन वाजताच्या दरम्यान शाळा सुटण्याची वेळ असल्याने पालकांनी सावधगिरी बाळगावी,असे आवाहन केले गेले होते.त्यानंतर या कोठे विरळ झाडे तर कोठे दाट झाडी असलेल्या जंगलात बिबट्याचा वनविभागाच्या चमूने शोध सुरू केला होता.अखेर त्याला पकडण्यात यश आल्याने नागरिकांसह हिंदी विद्यापिठातील विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी सुटकेचा श्वास घेतला.
मागील काही महिन्यांपूर्वी सावंगीच्या रुग्णालय परिसरात बिबट्या शिरला होता.त्या घटनेनंतर आज हिंदी विद्यापीठ परिसरातील जंगलात बिबट्या दिसला.हिंदी विद्यापीठाचा परिसर टेकड्यांसह जंगलाने व्यापलेला असल्याने येथे वन्यप्राण्याचा मुक्त संचाराला वाव मिळतो.तो लगतच्या जंगलातून शिरला असावा,असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.
यावेळी हिंदी विद्यापीठातील सुरक्षा रक्षक राहुल पाटणकर,अमित भुरे,रवींद्र वानखेडे,राजू गुरुनुले,आशिष मांडवकर यांनी बंदोबस्त ठेवण्यास सहकार्य केले.

## नगर परिषद उर्दु माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**घाटंजी :** घाटंजी नगर परिषद उर्दु माध्यमिक शाळा येथे गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी अ. हफिज शाळा व्यवस्थापन समिती हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून इम्रान शेख, गाजी खान होते प्रमुख पाहुणे यांच्या मुलांना मोफत गणवेश व त्या सोबत अभ्यास क्रमांची पुस्तके वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त मुख्याध्यापक सोहराब खान तर सुत्रसंचालन अतहर सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक जमील खान सर, शिक्षिका नजमा काझी व लीना गोत्क्छा यांनी प्रयत्न केले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या व्यायामाचे विचार आत्मसात करावे-खासदार रामदास तडस

**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**वर्धा :** राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांनी ''व्यायामाचे महत्त्व' या कावितेत मानवी जीवनातील व्यायामाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. व्यायाम केल्याने अंगातील आळस दूर होतो. अंगी उत्साह संचारतो. पचनशक्ती सुधारते व रक्ताभिसरण संस्था उत्तमप्रकारे कार्य करू लागते. शरीरातील स्नायू बळकट होण्यास मदत होते. माणसाचे आयुष्य वाढते व विकारांचा नाश होतो. रोगाचा प्रतिकार करण्याची शक्ती व विचारशक्ती वाढते म्हणजेच, सुदृढ शरीरासोबतच मानसिक, बौद्धिक आरोग्यही सुधारते, आज आपल्या गावात व्यायाम शाळा तयार झालेली आहे, त्यामुळे सुदृढ शरीर, मानसिक, बौद्धिक आरोग्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या व्यायामाचे विचार आत्मसात करून युवकांनी व्यायामाला प्राधाण्य द्यावे असे प्रतिपादन खासदार रामदास तडस यांनी यावेळी केले.

भुगाव येथे जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत क्रांतीवीर बिरसा मुंडा सभागृह येथील व्यायामशाळेचा लाकार्पण सोहळा खासदार रामदास तडस यांच्या शुभहस्ते संपन्नझाला, यावेळी माजी सभापती मिलींद भेडे, माजी पं.स.सभापती महेश आगे, माजी जि.प.सदस्य विमलताई वरभे, सरपंच श्रीमती दुर्गाताई थुल, उपसरपंच महादेवराव धोपटे, पोलीस पाटील संगिताताई जुगनाके, माजी सरपंच राजु नाखले, प्रदिप उगेमुगे, सुरेश सुटे उपस्थित होते.

यावेळी माजी सभापती मिलींद भेडे, माजी प.स.सभापती महेश आगे यांनी समोयोचीत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रविण उगेमुगे यांनी केले, संचालन अरविंद मेश्रामयांनी केले तर उपस्थितांचे आभार योगेश चिचोळकर यांनी मानले, कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता नवयुवक व्यायामशाळेचो सर्व सदस्यांनी परीश्रम घेतले, कार्यक्रमाला ग्रा.प.सदस्य सर्व श्री. अरविंद मसराम, मिनाताई येडमे, सुधाकर नाखले, लताताई क्षिरसागर, गौतम उरकुडे, प्रणिता कांबळे, आरती ढुमणे, भावना सावंत, नवयुवक व्यायामशाळेचे सर्व सदस्य व गावकरी उपस्थित होते.

पान ८ वरुन

### नगरपरिषद अंतर्गत निकृष्ट दर्जाची विकासाची कामे सुरुच

नागरिकांनी आरड ओरड सुरू केली केदार लेआउट मधील रहिवाशी भूषण अशोकराव कडू यांनी नगरपरिषद कार्यालयात लेखी तक्रार देऊन निकृष्ट दर्जाचे होत असलेले काम त्वरित बंद करण्यात यावे तसेच ठेकेदारावर कारवाई करावी अशी लिखित तक्रार नगर परिषद मुख्य अधिकारी सौरभ कावळे यांना दिली. बांधकाम ठेकेदारावर नजर ठेवल्याचे काम नगरपरिषद बांधकाम अभियंता राजेश ढोले यांच्याकडे आहे परंतु या रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरत असतानाही नगरपरिषद बांधकाम अभियंत्याचे याकडे लक्ष का गेले नाही? असा प्रश्न केदार लेआउट मधील रहवाशी करीत आहे. जेव्हा केदार लेआउट मधील रहवाशांनी लिखित तक्रार नगरपरिषद कार्यालय मध्ये दिल्यावर तेव्हा बांधकाम अभियंत्यास जाग येतो आणि ते बांधकाम ठेकेदारास नोटीस देऊन विचारणा करतात. देवळी शहरांमध्ये नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाच्या खेळ खेळोबा कधी थांबणार असा प्रश्न देवळीकरांना पडला आहे.
या बांधकाम ठेकेदारांना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यासाठी जो कोणता अधिकारी यांना डोळे झाक करून प्रोत्साहन देत आहे त्या अधिकाऱ्यावर मुख्याधिकारी सौरभ कावळे कारवाई का करीत नाही त्या अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना अभय का देत आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## हिंगणघाट शहर महिला काँग्रेस कमिटीचेवतीने किरीट सोमय्या यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन




**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**हिंगणघाट :** शहर काँग्रेस कमिटी तसेच महिला काँग्रेस कमिटीचेवतीने वर्धा जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा हेमलता मेघे यांचे नेतृत्वात किरीट सोमय्या यांचा निषेध करीत त्यांचे प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

सदर आंदोलन स्थानिक नंदोरी चौक येथे करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष हेमलता मेघे तसेच सौ, रागिणी शेंडे यांनी तीव्र शब्दात किरीट सोमय्या यांचे कृत्याचा निषेध नोंदवला. याप्रसंगी प्रतिभा चौधरी, छाया बाभुलकर, अर्चना भुते, सुनीता चंदनखेडे, निशा धोपे, बेबी कोल्हे, नंदा चौधरी, शारदा सोनटक्के, शकुंतला बावणे, सुनीता गुजरकर, मंदाकिनी ढोले अश्या असंख्य महिला कार्यकर्त्या व पदाधिकारी उपस्थित होत्या.

तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते पंढरीनाथ कापसे, प्रवीण उपासे यांचे सह ज्वलंत मून, नरेंद्र चाफले, सुवर्णा भोयर, पुष्पा लांबट, गायत्री गावंडे, सय्यद मेराज, गुणवंत कारवाटकर, राजू हिंगमीरे, सुनील हरबुडे, महिपल रामटेके, पुरुषोत्तम मून, सुरेंद्र बोरकर, गुणवंत कोठेकर, प्रविण धोटे, सुरेश गोहणे, चंदू पिठाडे, सुरेश गायकवाड, अंकुश ससाणे, चारभे गुरुजी, प्रमोद जुमडे, हनुमंत भाजीपाले, श्रीराम येळणे,दामोदर वानखेडे, गुणवंत वानखेडे, शंकर डुकरे, राजू मुडे, धनराज महाकाळकर, चंदू कुबडे, इत्यादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची भरतीला तांडा सुधार समितीचा विरोध



**साहसिक वृत्त / १९ जुलै**
**पुसदः** जिल्हा परिषदेच्या शाळांतील रिक्त असलेल्या शिक्षकांच्या जागेवर स्थानिक स्वराज्य संस्थेतील व खाजगी अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांची भरती करण्याचे शालेय शिक्षण विभागाने आदेश निर्गमित केले असून या आदेशाचा अखिल भारतीय तांडा सुधार समितीने विरोध केला आहे. राज्यामध्ये हजारो डी.एड.आणि बी.एड. पात्रता धारक बेरोजगार युवक नोकरीच्या शोधात असताना त्यांना कायमस्वरूपी शिक्षक पदावर भरती न करता सेवानिवृत्त झालेल्या आणि वयाची अठ्ठावन्न वर्ष पूर्ण केलेल्या सेवानिवृत्त शिक्षकांना वीस हजार रुपये प्रति महिना मानधनाचे अमिष दाखवून ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकाची कर्तव्य बजावण्याचे लालच दाखवणे ही राज्यातील सेवानिवृत्त शिक्षकांच्या स्वाभिमानाला ठेच पोहचवणारी बाब असल्याचे मत तांडा सुधार समितीचे महासचिव नामा बंजारा यांनी मांडले आहे. पात्रता धारक बेरोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. काम मिळत नाही म्हणून बेरोजगार तरुण आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. सेवानिवृत्त शिक्षकांची नेमणूक करून शासन पात्रताधारक युवकांची थट्टा करीत आहे. त्यामुळे अखिल भारतीय तांडा सुधार समिती यवतमाळ जिल्हा यांनी या शासन आदेशाचा विरोध केला असून तसे निवेदन मा. मुख्यमंत्री व मा.शिक्षणमंत्री पाठविले असल्याची माहिती यवतमाळ जिल्हा कार्याध्यक्ष संजय मदन आडे यांनी दिली आहे.

या वेळेस खालील पदाधिकारी उपस्थित होते सुदाम चिरंगे सरपंच लोहरा,गणेश भुजाडे सरपंच घाटोडी, गजानन टारफे सरपंच हर्षी, युवराज चाव्हण ग्रा प सदस्य, सुनिल देवराव चव्हाण, साहेबराव चोरमले, शैलेश सरगर पाटील, अविनाश राठोड,पवन राठोड उपस्थित होते.